I J R S S I S, Issue (VIII), Vol. II, Jan 2023: 209-215
A Double-Blind Peer Reviewed Journal
OPEN ACCESS
e-ISSN 2347 – 517X
Original Article

Reg. No. : MH-NGP/0000167
INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES
© VMS RESEARCH FOUNDATION www.ijrssis.in

# आदिवासी साहित्यिकांच्या जीवनजाणिवा

मृदुला निळकंठ रायपुरे–जांगडेकर
मराठी विभाग, डॉ. आंबेडकर महाविद्यालय, चंद्रपूर
*Corresponding Author :- mrudulajanglekar@gmail.com

Communicated : 20.12.2022 | Revision : 12.01.2023 Accepted : 20.01.2023 | Published: 30.01.2023

**सारांश :**
वैशिष्ट्यपूर्ण असलेल्या आदिवासींचे सारे आयुष्य जंगलाच्या व निसर्गाच्या सान्निध्यात जाते. या निसर्गाच्या सहवासातच त्यांच्या जीवनजीणिवा घडल्या. त्यांचा धर्म, श्रद्धा, सणवार, विवाहपद्धती, या सर्वांमधून त्यांच्या विशिष्ट जाणिवा प्रतीत होतात. तसेच त्यांचे सामाजिक संघटन, आर्थिक उलाढाली यांमधूनही त्यांच्या जीवनजाणिवांचा परिचय होतो. या जीवनजाणिवांच्या बळावरच आदिवासी साहित्यिक आपली साहित्यनिर्मिती करत आहेत. आदिवासी लेखक केवळ जन्माने आदिवासी असून चालत नाही तर त्यांच्यात ती खास 'आदिवासीपणा'ची जाणीव असावी लागते आणि ती जन्मजात असते. आदिवासी साहित्याची हीच खरी ओळख आहे. आदिम प्रेरणेतून उमगलेले साहित्य हेच खरे आदिवासी साहित्य होय.
प्रस्तुत लेखामध्ये आदिवासींच्या जीवनजाणिवा त्यांच्या साहित्यात कशा आणि कितपत अवतरतात याविषयीचे विचारमंथन केले आहे. त्यातील काही कमतरतांचा मागोवाही घेतल्या गेला आहे. या अनुषंगाने काही आदिवासी साहित्यिकांच्या साहित्याचा अभ्यास याठिकाणी केला आहे. आदिवासी लोकसंस्कृतीत त्यांच्या जीवनजाणिवा दडलेल्या आहेत. या जीवनजाणिवांचा सखोल परिणाम आदिवासी साहित्यिकांवर होऊन त्यांचे साहित्य साकार झाले आहे. डॉ. विनायक तुमराम, भुजंग मेश्राम, उषाकिरण आत्राम, वाहरू सोनवणे, कुसुम अलाम, बाबाराव मडावी, प्रा. माधव सरकुंडे, सुनिल कुमरे हे आदिवासी लेखक आपल्या 'आदिवासीपणा'च्या जाणिवेनी लिहत आहेत याचा परामर्श घेतला आहे.
**मुख्यशब्द :** साहित्यिक जीवनजाणिवा, आत्मप्रकटीकरण

## प्रस्तावना :

वैशिष्ट्यपूर्ण असलेल्या आदिवासींचे सारे आयुष्य जंगलाच्या व निसर्गाच्या सान्निध्यात जाते. या निसर्गाच्या सहवासातच त्यांच्या जीवनजीणिवा घडल्या. त्यांचा धर्म, श्रद्धा, सणवार, विवाहपद्धती, या सर्वांमधून त्यांच्या विशिष्ट जाणिवा प्रतीत होतात. तसेच त्यांचे सामाजिक संघटन, आर्थिक उलाढाली यांमधूनही त्यांच्या जीवनजाणिवांचा परिचय होतो. या जीवनजाणिवांच्या बळावरच आदिवासी साहित्यिक आपली साहित्यनिर्मिती करत आहेत. आदिवासी लेखक केवळ जन्माने आदिवासी असून चालत नाही तर त्यांच्यात ती खास 'आदिवासीपणा'ची जाणीव असावी लागते आणि ती जन्मजात असते. आदिवासी साहित्याची हीच खरी ओळख आहे. आदिम प्रेरणेतून उमगलेले साहित्य हेच खरे आदिवासी साहित्य होय.

प्रस्तुत लेखामध्ये आदिवासींच्या जीवनजाणिवा त्यांच्या साहित्यात कशा आणि कितपत अवतरतात याविषयीचे विचारमंथन केले आहे. त्यातील काही कमतरतांचा मागोवाही घेतल्या गेला आहे. या अनुषंगाने काही आदिवासी साहित्यिकांच्या साहित्याचा अभ्यास याठिकाणी करावयाचा आहे. आदिवासी लोकसंस्कृतीत त्यांच्या जीवनजाणिवा दडलेल्या आहेत. या जीवनजाणिवांचा सखोल परिणाम आदिवासी साहित्यिकांवर होऊन त्यांचे साहित्य साकार झाले आहे. डॉ. विनायक तुमराम, भुजंग मेश्राम, उषाकिरण आत्राम, वाहरू सोनवणे, कुसुम अलाम, बाबाराव मडावी, प्रा. माधव सरकुंडे, सुनिल कुमरे हे आदिवासी लेखक आपल्या 'आदिवासीपणा'च्या जाणिवेनी लिहत आहेत याचा परामर्श घेतला आहे.

## आदिवासी लेखकांच्या जीवनजाणिवा

आदिवासींची संस्कृती ही अतिप्राचीन, एकमेवाद्वितीय अशी आहे. आदिम समाजाचे अवशेष या संस्कृतीतच सापडतात. मात्र जागतिकीकरणाच्या कालौघात ही संस्कृती नामशेष होत आहे. तिचे जतन होणे अत्यंत आवश्यक आहे. हा दृष्टिकोन ठेवून डॉ. तुमराम यांनी आदिवासी साहित्य

आणि संस्कृती संवर्धन संस्थेचे अध्यक्षपद भूषवून मोलाचे कार्य त्याठिकाणी करत आहेत. आदिवासींमध्ये असलेले अज्ञान, दारिद्र्य, बेकारी, अंधश्रद्धा, अनेक समस्या जसे शिक्षण, आरोग्य यांचा अभाव हे आदिवासींच्या प्रगतीस मारक आहेत. दरी–डोंगरात, जंगलात वास्तव्य करणाऱ्या या आदिवासींचा विकास व्हावा या अनुषंगाने डॉ. तुमराम अनेक प्रबोधनपर सभा, संमेलने, मेळावे, यांचे आयोजन करतात. अनेकतेत एकता असलेल्या या देशात या देशातीलच मूळनिवासी असलेल्या आदिवासी बांधवांना आपल्या हक्कमागणीच्या बदल्यात बंदुकीच्या गोळ्या खाव्या लागतात. याहून खेदाची बाब आणखी कोणती असू शकेल? म्हणून आपल्या साहित्याच्या माध्यमातून आदिवासींचा विकास घडवून आणण्याची धडपड डॉ. तुमराम करत आहेत. ही साहित्याची चळवळ नसून चळवळीचे साहित्य आहे.

आदिवासी साहित्याच्या जमिनीला हळूहळू सुपीक करण्याचे काम अनेक आदिवासी साहित्यिक धिम्या गतीने का होईना, करत आहेत. त्यामध्ये स्त्री साहित्यिकांचा वाटाही थोड्या प्रमाणात आहे. उषाकिरण आत्राम, कुसुम अलाम, डॉ. माहेश्वरी गावित, कविता आत्राम, नजूबाई गावित अशी काही नावे सांगता येतील. यापैकी उषाकिरण आत्राम ह्या आदिवासी साहित्याच्या क्षेत्रात आघाडीच्या साहित्यिक आहेत. गोंडी भाषेतील मोट्यरीन (१९९३) हा पहिला त्यांचा कविता संग्रह आहे.

आदिवासी स्त्रियांच्या वेदनांना शब्दांत बांधण्याचे काम उषाकिरण आत्राम यांनी केले आहे. आदिवासी स्त्रीजीवनाचे विविध पैलू त्यांनी आपल्या कवितेतून उलगडले आहेत. २००९ साली श‘ खणीच्या तलवारी’ हा त्यांचा कवितासंग्रह प्रसिद्ध झाला. आपल्या कवितेच्या निर्मितीबद्दल त्या म्हणतात, ‘‘साहित्याचंही एक वेगळं श्रीमंतीचं जग आहे. त्या झगमगत्या जगात माझ्या सारख्या आदिवासी कवयित्रीच्या कवितेचं रूपडं सौंदर्यवान नसेल, पण जरूर ताकदवान व वास्तववादी आहे. हा नकली गलबला करणारा नाटकी चेहरा नाही, तर अस्सल साग आणि अस्सल नाग आहे.’’१ साहित्याची दुनियाही फसवी असू शकते. अशा दुनियेचा वरवर पाहता झगमगाट खूप असतो. लटक्या भावनांचा बाजार अशा साहित्यात मांडलेला असतो. वास्तविक जीवनाशी त्याचा फारसा संबंधही नसतो. उषाकिरण आत्राम यांना त्याची जाणीव आहे. म्हणून त्यांनी वरील वक्तव्यात आपल्या वास्तववादी लिखाणाचा आवर्जून उल्लेख केला आहे. संत चोखामेळा यांच्या ‘ऊस डोंगा परी रस नोहे डोंगा’ या अभंगाची या ठिकाणी आठवण होते. उषाकिरण आत्राम आपल्या कवितेचं रूपडं जरी वरवर पाहता सुंदर नसेल पण त्यात खऱ्या जाणिवांचा ओलावा आहे. आपल्या कवितेचं स्वरूप त्यांनी दमदार अशा शब्दांत मांडले आहे. ‘गोंडवाना दर्शन’ नावाच्या हिंदीतून प्रकाशित होणाऱ्या मासिकाच्या त्या संपादन मंडळातही काम करतात. हे आदिवासींच्या सामाजिक, वैचारिक जागृतीसाठी वाहिलेलं मासिक आहे. आदिवासींच्या अनेक पैलूंवर विचारमंथन करण्याचे हे पीठ आहे. या मासिकात आदिवासी भाषांविषयी, संस्कृती, इतिहास, साहित्य, त्यांच्या संघटना, राजकीय हक्क, आदिम समाजातील पवित्रतेचे घटक या सर्वांविषयी भारतभरातील विविध लेखकांचे अभ्यासपूर्ण लेख असतात. आदिवासी जीवनाचे आणि त्यांच्या स्थितीगतीचे विविध पैलू–कंगोरे उषाकिरण आत्राम यांनी रेखाटले आहेत.

भुजंग मेश्राम हे आदिवासी साहित्यिकांतले अव्वल दर्जाचे प्रतिभासंपन्न साहित्यिक होते. कवी, लेखक, संशोधक म्हणून त्यांची प्रसिद्धी होती. ‘ऊलगुलान’ (१९९०) हा त्यांचा पहिला कविता संग्रह आहे. या पहिल्याच कवितासंग्रहाने अनेक पुरस्कार पटकावले. या संग्रहातील कवितांनी मराठी साहित्यक्षेत्रात बराच प्रभाव पाडला. गोंडी,

बंजारी, परधानी, वारली, बाणेरी, वऱ्हाडी इत्यादी बोलीभाषांमधून त्यांनी कविता लेखन केले. मात्र प्रमाण मराठीतूनच त्यांची कविता अधिक वावरताना दिसते. प्रस्थापित समाजाशी संवाद साधण्याच्या हेतूने प्रमाण मराठीचा त्यांनी वापर केला असावा.

भुजंग मेश्राम यांच्या कवितेमुळे आदिवासी कवितेला मराठी कवितेच्या प्रवाहात स्वतंत्र अस्तित्व लाभले. २७ ऑगस्ट २००७ रोजी भुजंग मेश्राम यांचे अंबरनाथ येथे अकाली निधन झाले. त्यानंतर एका वर्षाच्या पश्चात त्यांचा 'अभुजमाड' नावाचा कविता संग्रह प्रकाशित झाला. अभुज माड हा छत्तीसगड मधील बस्तर क्षेत्रातील अतिशय दुर्गम असा डोंगराळ भाग आहे. या भागात 'अभुज माडिया' या आदिवासींची विरळ वस्ती आहे. या अभुज माडिया गोंडांशी भुजंग मेश्राम आपले नाते सांगतात आणि त्यांच्या सामाजिक–सांस्कृतिक–भाषिक जीवनात आपली पाळेमुळे शोधतात. गोंडांचा माडियांशी संबंध जोडणारा दुवा म्हणजे 'आदिवासी' असणे ही जाणीव आहे. 'अभुज माड' नावाच्या पहिल्याच कवितेत घनगर्द वनराईतील पर्वताशी कवी आपले नाते सांगतात, ते या शब्दांत,

''लामसडक अजगरावानी हिरवाकच्च परबत
आस्सं वाट्टे, तो येतो माह्य अंगावर्ती
नय नय, आस्स बी वाट्टे तो असावा झोपेतनी घोरत
हॅट! घोरण्यामंदी असतो का दरद?
मंग? वाट्टे, तो बेमारीत कण्णत कण्णत
नय नय, तो माला मारत असाव हाक–बिक
या परबताचं म्या काय लाकतो देणं?
जे आईन रामाच्या पहारी देतो सपनात भेट
त्याला कसे फुटतात पाय नय मालूम''२ –(अभुज माड)

निसर्गाशी माणसाचे नाते किती दृढ असतात, ते या कवितेतून प्रतीत होते. भुजंग मेश्राम यांच्या लिखाणातून वैचारिकतेची बैठक त्यासोबतच आदिवासींविषयी तीव्र आस्था दिसून येते. एकूणच त्यांचे लेखन हे नवे भाषाभान व समाजभान देणारे आहे.

कुसुम अलाम गडचिरोली या आदिवासीबहुल क्षेत्रात कार्य करीत आहेत. आपल्या लेखणीच्या माध्यमातून आदिवासी जीवनाची वेदना त्या मांडतात. त्यांच्या कविता वाचताना हे आत्मनिवेदन स्त्रीच्या कोमल हृदयाचे आहे, याची जाणीव होते. जंगल–रान यांच्या सान्निध्याने राहणाऱ्या आदिवासींच्या जीवनजाणिवांचा पट उलगडण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे असे वाटते. 'रानआसवांचे तळे' या कविता संग्रहात आपल्या लिखाणाच्या प्रयोजनाबद्दल त्या म्हणतात, ''कविता लिहिणे हा माझा व्यवसाय किंवा छंदही नाही. कवयित्री म्हणून मिरवणे माझी हौसही नाही. वेदनेची लक्तरे ओढून जगणारी मी वेदनामयी आहे. मला संवेदना आहे. म्हणूनच हा संवाद!''३ कुठल्याही प्रसिद्धीचा हव्यास मनात न बाळगता केवळ आपल्या जमातीचे प्रातिनिधिक दु:ख लोकांपुढे मांडण्याचा हा प्रामाणिक मानस आहे. डॉ. विनायक तुमराम म्हणतात, ''पेटु पाहणाऱ्या रानगर्भातल्या अंधाराची ओळख म्हणजे ही कविता होय. संस्कृतीसकट मूळनिवासी समूहाच्या सर्वनाशावर उठलेल्या क्रौर्याला दग्ध करू पाहणारी ती एक वाङ्मयीन दाहकता आहे.''४ आपली लोकसंस्कृती किती अमूल्य आहे, याचा सार्थ अभिमान कवयित्रीला आहे. 'सावध क्षणी' या कवितेतील काही ओळी पहा,

''माझ्या संस्कृतीची ओळख झाल्यापासून
मी सत्य जाणले आहे
माणसाला माणूसपणा बहाल करण्याची शक्ती
माझ्या संस्कृतीचे मूलस्त्रोत आहे.''५ –(सावध क्षणी)

प्रत्येकाला आपल्या संस्कृतीचा अभिमान असतो. पण ज्यांची संस्कृती हीन ठरविल्या जाते त्यांना आवर्जून व कळकळीने आपल्या संस्कृतीविषयी विचार मांडावे लागतात. वरील ओळींतून कवयित्रीच्या आपल्या

संस्कृतीविषयीच्या आपुलकीच्या भावना दिसून येतात. ही संस्कृती जपली पाहिजे पण त्यातील दारिद्र्य, भूकेचे काटे काढून तिला निरोगी केले पाहिजे, ही मनिषा कवयित्री बाळगते. यासोबतच दुनियेच्या नजरा आदिवासींबाबत किती दूषित झाल्या आहेत, याचेही दर्शन अनेक कवितांतून होते. कुसुम अलाम यांचे वाङ्मय विपुल नसले तरीही त्यांच्या या दोनच काव्यसंग्रहातून आदिवासी जाणीव प्रकर्षाने जाणवते. आपले प्रातिनिधीक दु:ख त्यांनी वेशीवर टांगताना मनाचा संयम बाळगला आहे.

संपूर्ण आदिवासी समाजाचे सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक स्तरावर होणारे शोषण हा वाहरू फुलसिंग सोनवणे यांच्या कवितेचा मुख्य विषय आहे. 'गोधड' या कवितासंग्रहात मराठी कविता एकूण ३८ आहेत तर भिल्लोरी कविता १६ आहेत. जवळ–जवळ सर्वच कवितांमधून आदिवासींचे दारिद्र्य, भूक आणि त्यांचे होणारे शोषण यांचा भडिमार वाचकांच्या मनावर होतो. तीनच ओळींची आणि नऊ शब्दांची ही कविता शोषणाच्या तीव्रतेचा उच्चांक गाठणारी आहे.

''ऊसाचा रस पिणारी माणसं
आणि
माणसांचे रस पिणारे ऊस''६ –(आणि)

ही अल्पाक्षर असलेली कविता तमाम आदिवासींचे वेदनामयी जीवन चितारते. थोड्या शब्दांत मोठा आशय प्रकटवणारी ही कविता आहे. गोड ऊसांनी आदिवासींच्या जीवनाला कडू करून टाकले आहे. याचा प्रत्ययकारी अनुभव या कवितेत होतो. याशिवाय 'स्त्री', 'देवदासी' या कविता स्त्रियांचे दैन्य व सामाजिक, सांस्कृतिक स्तरावर होणाऱ्या त्यांच्या शोषणाला वाचा फोडते. डॉ. संजय लोहकरे म्हणतात, ''माणूस आणि निसर्ग, संस्कृती आणि मूल्ये, क्रांती आणि परिवर्तन हेच त्यांच्या कवितेचा मुख्य आशय आहे.''७ रोडाली ही आदिवासींची नृत्य, नाट्य व संगीताची परंपरा आहे. त्यांच्या संस्कृतीचा तो अमोल ठेवा आहे. या रोडालीच्या माध्यमातून वाहरू सोनवणे यांनी आदिवासींवर होणाऱ्या अन्याय–अत्याचारांना वाचा फोडली आहे.

डॉ. माधव सरकुंडे हे आदिवासी साहित्यातील एक उल्लेखनीय नाव आहे. कथा, कादंबरी, कविता, वैचारिक लेखन अशा अनेक प्रकारचे साहित्यलेखन त्यांनी केले. 'ताडमं' या संग्रहाबद्दल ते मनोगत व्यक्त करतात, ''ताडमं हा कथासंग्रह खरं म्हणजे व्यथासंग्रह आहे. माझ्या भोवतालच्या माणसांच्या आयुष्याचा पट आहे. त्यातले बरेच माणसं माझ्या नात्याचे आहेत... ही माणसं माझ्या मनात कुसळासारखी रूतत होती... मन मोकळं करण्यासाठी या माणसांच्या व्यथा मी कागदावर उतरविल्या, त्याच्या कथा झाल्या.''८ आंबेडकरी समाजाप्रमाणेच आदिवासी समाजसुद्धा जागरूक होऊन त्यातून अभेद ऐक्य उदयाला येण्याची अपेक्षा त्यांनी केली आहे.

तिरकमठा या पारंपरिक आयुधाच्या सहाय्याने प्रस्थापित समाजातील विषमता, अन्याय ह्यांचे शरसंधान करण्यासाठी सुनिल कुमरे सज्ज झाले. त्यांच्या लिखाणाला वैचारिकतेची बैठक आहे.

**आदिवासी साहित्यातील आत्मप्रकटीकरण :**

आदिवासींनी आपल्या जीवनजाणिवा शब्दबद्ध केल्या. त्यातून त्यांचे साहित्य अवतरले. थोड्या शब्दांत अधिक आशय मांडण्यासाठी त्यांनी सर्वप्रथम कवितेला जवळ केले, जे अत्यंत स्वाभाविक होते. आदिवासींनी या आत्मप्रकटीकरणाला वेगवेगळी नावे दिली आहेत. कुणी त्याला 'हुंकार' म्हणतो तर कुणी 'हाकारा'. त्यांचे साहित्य हे त्यांच्या आत्मप्रकटीकरणाचे साधन आहे. आपल्याच विश्वात सुखदु:खांची, वेदना–कष्टांची, गुंगमतीने रानावनात एकाकी माळ गुंफण्यात आदिवासी मग्न होता. कसलेच

आत्मभान नव्हते. मात्र सारस्वताचा झरा जेव्हा वाहायला लागला, तो झुळझुळ वाहत आदिवासी समाजाच्या दारापर्यंत येऊन पोहोचला. सहृदय रसिक त्यात चिंब झाले. या आधीच्या आंबेडकरी साहित्याने त्यांना हालवून सोडलेच होते. आदिवासी जीवनजाणिवा त्याहून वेगळ्य होत्या. त्यांचे जगणे वेगळे होते.

आदिवासी साहित्याची सुरूवात अशा प्रकारे कवितेने झाली. त्यांच्या कवितांचे दालन समृद्ध आहे. विविध जाणिवांवर भाष्य त्यांनी आपल्या कवितांतून केले आहे. त्यानंतर कथासंग्रह, आत्मपर कादंबरी, वैचारिक लेखन, काही प्रमाणात नाटके, अशा विविध साहित्यप्रकारांचा हात धरून, वेगवेगळ्य रूपबंधात लिहिण्याचा ते प्रयत्न करत आहेत. डॉ. गोविंद गारे, वाहरू सोनवणे, भुजंग मेश्राम, डॉ. विनायक तुमराम, उषाकिरण आत्राम, सुखदेवबाबु उईके, प्रा. वामन शेळमाके, चामुलाल राठवा, डॉ. माधव सरकुंडे, दशरथ मडावी, बाबाराव मडावी, कृष्णकुमार चांदेकर, कुसुमताई अलाम, सुनिल कुमरे, वसंत कनाके, पितांबर कोडापे, बापुराव आडे, प्रभू राजगडकर, गणेश परतेकी, शंकर बळी, कविता आत्राम, धनराज मसराम, पी. डी. आत्राम, अशा अनेक जुन्या–नव्या पिढीतील कवी कवितांच्या माध्यमातुन आपले आत्मप्रकटीकरण करत आहेत. आतापर्यंत मुक्या असलेल्या आदिवासी समाजाचा हुंकार म्हणजे आदिवासी साहित्य होय.

''जखमांनी जगतोय मी
जखमाच जगवतात मला
माणुसकीची वाटचाल
जखमाच दाखवतात मला''१७ –(जखमा)

हे डॉ. गोविंद गारे यांचे आत्मप्रकटीकरण प्रारंभी वैयक्तिकच असते. नंतर त्यातील भावनांचे सामान्यीकरण होऊन ते वैश्विक पातळी गाठते. प्रत्येक आदिवासी साहित्यिक माणुसकीचा भुकेला आहे. त्याच्या रोमारोमात माणुसकीचाच गहिवर आहे. जगलेल्या, भोगलेल्या जखमांवरही माणुसकीची फुंकर घालून ती सारी वेदना विसरू पाहत आहेत. आत्मजाणिवेने स्फुरलेले हे शब्द आहेत. जे काही सांगितले ते खास आपले आहे, या भावनेतून आदिवासी साहित्यिक लिहितात.

आदिवासी कवितांच्या आत्मप्रकटीकरणातून त्यांच्या लोकसंस्कृतीचे चित्रण मुख्यत्त्वे करून येते. कवितासंग्रहांचे शीर्शकच जसे, 'गोधड', 'तीरकमठा', 'किंगरी', 'टाहरा', 'रोडाली', इत्यादी लक्षात घेतले तर आदिम जीवनातील जे काही अवशेष अजूनही आदिवासींमध्ये आहेत त्याचा संपूर्ण गोषवारा त्यांच्या कवितेत येतो. आदिवासींचे जीवन कलांनी ओतप्रोत भरलेले आहे. संगीत, नृत्य हे आदिवासींचे मनोरंजनाचे साधन नव्हे तर जगण्याचे साधन आहे.

पुरूषांहून अधिक संवेदनक्षम असलेल्या स्त्रीमनाच्या वेगळ्यच जाणिवा असतात. त्यातल्या त्यात आदिवासी स्त्रीमन हे तेवढंच कणखर आणि तेवढंच नाजूक असते. म्हणूनच तर कधी–कधी प्रियकराच्या विरहाने व्याकुळ झालेली 'बेके होत्तूर मावा जीवा' करत वेडी पिशी होते तर कधी 'पयसाची लाल तांबडी आग' होऊन अन्यायालाही बेचिराख करू पाहते. आदिवासी महिला पारंपरिक रूढींची गुलाम असलेली स्त्री नाही. ती बंडखोर आहे. तिचे बंड अन्याय, शोषण, या विरूद्धचे आहे. झालेल्या अन्यायावर टिपूस गाळत बसण्यापेक्षा शत्रूशी दोन हात करण्यासाठी ती तयार आहे. ही शक्ती तिला निसर्गातून मिळाली आहे, हेही तितकेच खरे. आदिवासी स्त्री जीवनाच्या अगतिकतेची सुरूवात होते ती आधुनिक जीवनाचा व तेथील लोकांचा संपर्क आल्याने. प्रगत समाजाने तिला छळले, नागवले, वापरले. त्यामुळे तिची नैसर्गिक ताकद ती हरवून बसली आहे. याचे संदर्भही आदिवासी कवितेत पदोपदी दिसतात. आदिवासी कविता म्हणजे आदिवासी स्त्रियांचा आकांत आहे. आदिवासी लेखक जेव्हा जेव्हा लेखणी उचलतो

तेव्हा तेव्हा त्याच्या लेखणीतून त्यांच्या लोकसंस्कृतीच्या वेदनाच पाझरतात.

आदिवासी साहित्यिक कवितेतून जितके अभिव्यक्त झालेत तितके अन्य प्रकारांतून झाले नाहीत. ज्या थोड्या साहित्यिकांनी आपले साहित्य सादर केले ते दर्जेदार आहे. आदिवासी जीवनाचा ठाव घेण्यास ते सहाय्यभूत ठरले आहे. बाकी साहित्यिकांचे आत्मप्रकटीकरण प्रभावी वाटत नाही. भाषेचा यात अडसर आहे. पण भविष्यात ज्या भाषेतून अभिव्यक्ती व्हायचे आहे त्या भाषेवर प्रभुत्त्व मिळविल्याशिवाय त्यांच्या आत्मप्रकटीकरणाला मजबूती येणार नाही.

**निष्कर्ष :**

१. हजारों वर्षे जंगलात जनावरांप्रमाणे वास्तव्यास असलेल्या आदिवासींचे आत्मप्रकटीकरण त्यांच्या साहित्यातून झाले. आदिवासी साहित्यिकांच्या या आत्मप्रकटीकरणातून सर्जनशील साहित्याची निर्मिती झाली. ही निर्मिती त्यांच्या जीवनगर्भातून झाली आहे. संपूर्ण आदिवासी साहित्याचे आत्मप्रकटीकरण वेदनेने भरलेले आहे. जगण्याच्या धडपडीत मरण व रोजच्या मरण्यात जगण्याचा शोध, हे आदिवासी जीवन साहित्यात आत्मप्रकटीकरणाच्या माध्यमातून येते. आदिवासींच्या आत्मप्रकटीकरणात साहित्यभाषेचे अपूरे ज्ञान दिसून येते. ज्या भाषेत त्यांना अभिव्यक्त व्हायचे आहे, त्या भाषेचे परिपूर्ण ज्ञान मिळविणे गरजेचे आहे.

२. आदिवासी साहित्याच्या आत्मप्रकटीकरणाचे काही विशेष जाणवतात. दु:ख, वेदना, दारिद्र्य, कुपोषण यासोबतच उज्ज्वल इतिहास, समृद्ध संस्कृती यांची रम्य वर्णने साहित्यातून प्रकटली आहेत. स्त्री लेखिका—कवयित्री यांच्या साहित्यातून भावपूर्ण, स्त्रीसुलभ अषा जाणिवा प्रकट झालेल्या आहेत.

३. अस्सल जीवनानुभव या कलात्मकतेच्या कसोटीवर आदिवासी कविता निश्चितच खरी उतरते. आदिम जीवनातील संकल्पना, लोकवस्तू इत्यादींची वर्णने आदिवासी कविता करते. ही कविता आदिवासी लोकसंस्कृतीचे जतन करते. आदिवासी कवितेत आंबेडकरी साहित्यातील वेदना, विद्रोह व नकार या तत्त्वत्रयींचा अनुभव येतो. मात्र वेदनेव्यतिरिक्त विद्रोह व नकार यांना फारशी धार नाही.

४. आदिवासींच्या काव्यनिर्मितीत त्यांचे सांस्कृतिक अनुबंध दडलेले आहेत. जसजशी संस्कृती बदलत आहे, तसतशी नवनवीन रूपे त्यांची कविता धारण करत आहे. आदिवासींच्या बोली त्यांच्या लोकसंस्कृतीशी निगडीत असल्याने बोलींचा वापर करून आदिवासी साहित्याची पुढील वाटचाल व्हायला हवी.

५. आदिवासींचे जीवन कालमानाने झपाट्याने बदलत आहे. जागतिकीकरणाचा, आधुनिकिकरणाचा आदिवासींवर बरावाईट परिणाम होत आहे. त्यातही त्यांच्यात होणारे सांस्कृतिक बदल त्यांच्या अस्तित्वासाठी, आस्मितेसाठी भयावह आहेत. त्यांची ओळख पुसल्या जात आहे. या बदलाला सामोरे जाण्यासाठी साहित्याचा आधार घेऊन आदिवासींनी मार्गक्रमण करायला हवे. काळ बदलणारच आणि त्यानुसार जीवन, संस्कृतीही बदलणार. साहित्यात त्याचे जतन होऊ शकते, याकडे त्यांनी लक्ष द्यावे.

**संदर्भ :**

आत्राम उषाकिरण, 'लेखणीच्या तलवारी', हरिवंश प्रकाशन, चंद्रपूर, २००९, पृ. ३.

मेश्राम भुजंग, 'अभुज माड', लोकवाङ्मयगृह, मुंबई, २००८, पृ. १.

अलाम कुसुम, 'रानआसवांचे तळे', मुद्रक—भुषण बनहट्टी, नागपूर, १९९८, पृ. २४.

तत्रैव, पृ.९.

अलाम कुसूम, 'रान पाखरांची माय', हरिवंश प्रकाशन, चंद्रपूर, २०००, पृ. ४६.

सोनवणे वाहरू, 'गोधड', सुगावा प्रकाशन, पुणे, २००६, पृ. ८.

सोनवणे वाहरू, 'रोडाली', विद्रोही सांस्कृतिक चळवळ, महाराष्ट्र, २०१४, पृ. २२.

सरकुंडे माधव, 'ताडमं', साकेत प्रकाशन, औरंगाबाद, २००१, पृ. ६.

सोनवणे वाहरू, 'गोधड', सुगावा प्रकाशन, पुणे, २००६, पृ. ४३.